# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.२० दिनांक २५/०२/२०२१

## दिवंगत पोलीस अंमलदार यांच्या कुटुंबियांना पालघर पोलीस दलात अनुकंपा तत्वावर पोलीस शिपाई या पदावर मा.पोलीस महासंचालक याच्या हस्ते नियुक्तीपत्र दिलेबाबत.

दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ रोजी पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई व कोकण परिक्षेत्र यांचे सयुंक्त विद्यमाने मा.श्री.हेमंत नगराळे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या हस्ते कोरोना कालावधीमध्ये व त्यापुर्वी पोलीस कर्तव्यावर निधन झालेल्या पोलीस अंमलदाराच्या पोलीस पाल्य व पोलीस पत्नी यांना पोलीस दलामध्ये अनुकंपा तत्वावर नियुक्तीपत्र देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमामध्ये पालघर जिल्हयातील १७ पोलीस पाल्य व पोलीस पत्नी यांना पालघर पोलीस दलात अनुकंपा तत्वावर नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.

सदरची प्रक्रिया पालघर पोलीस दलाकडुन अतिशय जलद गतीने २० दिवसात पुर्ण करुन दिवंगत पोलीस अंमलदार यांच्या कुटुंबातील १७ पोलीस पाल्य व पोलीस पत्नी यांना पालघर पोलीस दलात नवप्रविष्ठ पोलीस शिपाई म्हणुन समाविष्ट करण्यात येवुन त्याना गौरविण्यात आले आहे. पालघर जिल्हयात प्रथमच एवढया मोठया संख्येने अनुकंपा तत्वावर भरती करण्यात आली आहे. यावेळी नवनियुक्त पोलीस अंमलदार हे कोरोना कालावधी सारख्या अडचणीच्या वेळी पोलीस प्रशासनाने केलेली मदत व पालकांच्या जागी केलेल्या नियुक्तीमुळे भारावुन गेले आहेत. कोरोना काळात कार्यरत असलेले पोलीस अंमलदार यांच्या स्मृती जागवून अत्यंत कमी कालावधीमध्ये नियुक्तीपत्र देण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे.

सदरची प्रक्रिया मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक पालघर, मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली मा.श्री.शैलश काळे, पोलीस उपअधीक्षक (गृह), पोलीस निरीक्षक श्री.सुरेश कदम, राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री. कदम, वरीष्ठ लिपीक श्री. विलास गोविंद, वरीष्ठ लिपीक श्री. सतीश काटकर यांनी केली आहे.